म.सं.कौ.हि.का.अर्ज९/२०२३

निशाणी क्रमांक ०७ खाली....

**<u>सरतपास अर्जदारातर्फे विधीज्ञ श्री. डी. पी. काळे यांचेतर्फे शपथेवर सुरु....</u>**

मी पुराव्याकामी नि.क्र. ०७ दाखल केला असुन त्यातील मजकुर माझ्या सांगण्याप्रमाणे लिहीला असुन तो मी वाचुन समजुन घेउन त्यावर सही केली आहे.

सरतपास पुर्ण.

**<u>उलटतपास गैरअर्जदारांतर्फे विधीज्ञ श्री. एम. व्ही. कसाणे यांचेतर्फे सुरु....</u>**

माझे पदवीपर्यंत शिक्षण पुर्ण झालेले आहे. लग्नाच्या आधी मी वेरुळ येथील आश्रममध्ये राहत होती. त्या आश्रमात मी, माझी आई व माझा भाउ राहत होतो. माझे वडिल आमच्यासोबत राहत नसून ते गावात राहतात. माझे वडिलांनी दुसरे लग्न केलेले आहे. माझे लग्न वेरुळ येथील आश्रमात झाले आहे. मी पाच ते सहा महिने सासरी राहिले होते. मी लग्नानंतर रितीरिवाजाप्रमाणे ज्या कार्यक्रमाला माहेरी जावे लागत होते त्या कार्यक्रमाला जात होते. हे म्हणणे खरे आहे की, वेरुळ येथील आश्रमात धार्मीक कार्यक्रम असायचे. हे म्हणणे खरे नाही की, मी आजारी होते म्हणून माहेरी आले. माझे दाग–दागिणे सासरी आहे यासंदर्भात माझ्याकडे कोणतेही दस्त नाही. मी खुलताबाद पो. स्टे. येथे गैरअर्जदाराविरुध्द तक्रार दिली होती. गैरअर्जदाराचे कोणासोबत अनैतिक संबंध होते त्यांचे नांव मला सांगता येणार नाही. गैरअर्जदार किंवा त्यांच्या घरच्या लोकांनी मला मानसिक त्रास दिले म्हणून मी पो. स्टे. ला तक्रार केली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, मी महिला तक्रार निवारण केंद्रामध्ये मला गैरअर्जदारासोबत जायचे नाही असे लिहून दिले होते. हे म्हणणे खरे आहे की, गैरअर्जदाराकडे जमीन किंवा घर आहे याबाबतचे कोणतेही कागदपत्र मी अभिलेखावर दाखल केले नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझी आई व माझा भाउ यांच्या जमीनीवर त्यांनी देवगिरी बँकेचे कर्ज काढले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सासरी नांदत असतांना माझे भाउ व आईला देवगिरी बँकेचे कर्ज वसुलीसाठी नोटीस आली होती. हे म्हणणे खरे नाही की, मी कापड दुकानामध्ये कामाला आहे. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदार हा काही काम करत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी स्वतःहून घरातून निघून गेले. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदाराने माझा कधीही मानसिक व शारिरीक

छळ केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदार हा शारिरीक त्रास देत होते व शिवीगाळ करत होते हे मी माझे शपथपत्रात खोटे लिहीले आहे. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदार यांनी मला कधीही शिवीगाळ केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदार हा प्लॉट खरेदी विक्रीचा व्यवहार करतो हे मी खोटे सांगीतले आहे. हे म्हणने खरे नाही की, मी शपथपत्रातील गैरअर्जदाराविरुद्ध खोटे आरोप केले आहेत. हे म्हणने खरे नाही की, गैरअर्जदाराने कधीही मानसिक छळ व मारहाण केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदार काही काम करत नाही म्हणून मी स्वतःच त्याच्यासोबत राहत नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझे पती काही कामधंदा करु शकत नाही म्हणुन तो मला पोटगी देवू शकत नाही. हे म्हणने खरे नाही की, मी अर्जात व शपथपत्रात सांगीतलेल्या सर्व खोटे आहे. हे म्हणने खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

SHRAVANTI VIJAY RAJKUNTWAR

Digitally signed by SHRAVANTI VIJAY RAJKUNTWAR
Date: 2024.04.26 15:13:32 +0530

(एस.व्ही.राजकुंटवार)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
खुलताबाद, जि. औरंगाबाद,

दिनांक २४/०४/२०२४